श्री व्यंकटेश महाविद्यालयांमध्ये एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

" एम.बी.ए. हा कोर्स आपले करिअर घडवण्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. एम.बी.ए. कोर्स नंतर आपणास अनेक संधी उपलब्ध होतात. म्हणून विद्यार्थ्यांनी एम.बी.ए. कोर्स कडे एक करिअर संधी म्हणून पाहणे गरजेचे आहे. चांगल्या महाविद्यालयातून एम.बी.ए. कोर्स केल्यास आपणास करिअरसाठी वेगवेगळ्या कंपन्यांमधून नोकरीची संधी मिळू शकते. म्हणून विद्यार्थ्यांचा या कोर्सकडे वाढता कल आहे." असे प्रतिपादन राजाराम बापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राध्यापक डॉ. के. एस. पाटील यांनी केले. ते अकाउंटन्सी असोसिएशनच्या वतीने "एम.बी.ए.- सीईटी तयारी" या विषयावर राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इस्लामपूर व श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेमध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यशाळेत एम.बी.ए. सीईटीचे फॉर्म भरणे, सीईटी अभ्यासक्रम, लॉजिकल रीजनिंग या विषयावर डॉ. के. एस. पाटील सहाय्यक प्राध्यापक इस्लामपूर यांनी मार्गदर्शन केले. तसेच प्रा. संकेत सिंग यांनी रीडिंग कॉम्प्रेशन, संख्यात्मक विश्लेषण यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस बी.कॉम. भाग तीन व बी.बी.ए. भाग तीन या वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते. माननीय प्राचार्य डॉ. व्हि. ए. माने सर यांनी कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना सीईटी परीक्षेचे असणारे महत्त्व, सीईटी परीक्षेचे मार्क, प्रश्नांचे स्वरूप, प्रश्नपत्रिका यावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या सुरुवातीस डॉ. एस. एच. आंबवडे यांनी प्रास्ताविक तर कार्यक्रमाचे पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. पी. पी. दाइंगडे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी चे प्राध्यापक डॉ. के. एस. पाटील